SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
# WOMEN'S UNIVERSITY
1, Nathibai Thackersey Road, Mumbai-400 020.
Telegram : UNIWOMEN ● Telephone : 2203 1879 ● Fax : 22018226

**Ref. No.** स्पेशल सेल/I-३४(अ)/२०१३-१४/१८e

दिनांक :- २३ सप्टेंबर २०१३

प्रति,
प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख/समन्वयक/ प्रभारी,
सर्व संचलित व संलग्न महाविद्यालये/ विभाग/ संस्था,
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- ई- स्कॉलरशिप- मागासवर्गीय विद्यार्थ्यीनीच्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्काचे वितरण योजनेचे संगणकीकरण करुन बॅंकेमार्फत वितरण करण्याबाबत...

महोदय/महोदया,

कृपया, उपरोक्त विषयावरील शासन निर्णय पहावेत. सदर निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यीनीच्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्काचे वितरण योजनेचे संगणकीकरण करुन बॅंकेमार्फत वितरण करण्याचे शासनाद्वारे निश्चित करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थीनींनी विहित नमुन्यात दि. २८/१०/२०१३ पूर्वी on-line अर्ज करणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागाच्या www.mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर on-line शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्काचे अर्ज वेळेत भरुन घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी कृपया नेट कनेक्शनसह संगणक, प्रिंटर तसेच प्रसंगी फॉर्म भरण्यासाठी सहाय्यक उपलब्ध करुन देणे .

शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग /मावक-३,मंत्रालय,मुंबई यांच्या निर्देशानूसार, ई-स्कॉलरशिप-मागासवर्गीय विद्यार्थ्यीनीच्या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता वेळेवर करुन घ्यावी ही विनंती. सदर माहिती विहित प्रपत्रांत परिपूर्ण भरुन घेवून विना विलंब दिनांक २८/१०/२०१३ पूर्वी शासनाच्या संबंधीत विभागास सादर करावी. सदर बाब पूर्ण करुन, एक प्रत उपकुलसचिव विशेष कक्ष यांना सादर करावी किंवा संबंधीत कामी अडचण असल्यास, उपकुलसचिव, विशेष कक्ष यांच्याशी संपर्क साधावा.

आपणांस कळविण्यात येते की, सदर कामकाजास दिरंगाई झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य/प्रभारी यांची राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

आपली विश्वासू,

(डॉ. सा. कुमुधाव्वली )
कुलसचिव
23/9

प्रत सादर :- १) मा. कुलगुरु
२) मा. प्र- कुलगुरु
३) मा. संचालिक,माविविमं
४) मा.वित्त व लेखा अधिकारी
५) मा. परिक्षा नियंत्रक, परिक्षा विभाग
६) सर्व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव